# * जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा. *

## ❖ निविदा सूचना ❖

माननिय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा यांचे आदेशानुसार जिल्हा न्यायालय, वर्धा व तालूका न्यायालयांकरीता तेथे उपलब्ध असलेल्या वॉटर कूलरवर स्थापीत करण्यासाठी वॉटर प्युरीफायर (जलशुद्धीकरण यंत्र) खरेदी करावयाचे आहे. करीता प्रतिष्ठानांना सूचित करण्यात येत आहे की, ज्यांना वॉटर प्युरीफायर (जलशुद्धीकरण यंत्र) करीता निविदा सादर करावयाच्या आहे त्यांनी आपली निविदा बंद लिफाफ्यामध्ये आवश्यक त्या सर्व दराने विवरणासह जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे **दिनांक २०/०२/२०१६ ला सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत** अथवा त्या आधी या कार्यालयात सादर करावी.

### ● निविदेच्या अटी व शर्ती ●

१) सदरचे जलशितक यंत्र हे उच्च दर्जाचे व कंपणीचे असावे. जेणेकरून शासकीय कार्यालयात जास्तीत जास्त काळ जलशुद्धीकरण यंत्र कार्यान्वीत राहील.

२) जिल्हा न्यायालय, वर्धा व तालूका न्यायालय येथे सदर जलशुद्धीकरण यंत्र स्वत: व स्वखर्चाने स्थापीत करून दयावे लागेल.

३) निविदा प्राप्त झाल्यावर संपूर्ण प्रस्ताव मा. उच्च न्यायालय, मुंबई मार्फत शासनास मंजूरीकरीता सादर करण्यात येईल व शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यावरच आपणांस सूचविलेल्या ठीकाणी जलशुद्धीकरण यंत्र लावून दयावे लागेल.

४) जलशुद्धीकरण यंत्राचे वॉरंटी कालावधीचा निविदेत स्पष्ट उल्लेख करावा. तसेच जलशितक यंत्राचे मॉडेल, कंपनी (Prospectus/flip chart) व इतर आवश्यक सविस्तर माहितीसह निविदा सादर करावी.

५) जलशुद्धीकरण यंत्राचे दर प्रति नग प्रमाणे सादर करावे.

६) निविदेच्या बंद लिफाप्यावर **''जलशुद्धीकरण यंत्राकरीता निविदा''** असे स्पष्ट लिहावे.

७) निविदा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा या नावाने सादर करावी.

८) कोणतीही निविदा किंवा संपूर्ण निविदा प्रक्रीया रद्द करण्याचा अधिकार माननिय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा यांना राहिल.

९) **दिनांक २०/०२/२०१६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत** किंवा त्या अगोदर आपली सीलबंद दर निविदा या कार्यालयाला पोहचणे आवश्यक आहे. तदनंतर प्राप्त निविदांचा विचार करण्यात येणार नाही.

स्वा./-
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.

पृष्ठांकन क्र. ७७० /नाझर/२०१६.
दिनांक : ०६/०२/२०१६.

**प्रतिलीपी माहितीस व योग्य कार्यवाहिस सादर. :**

१) नोटीस बोर्ड, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.
२) नोटीस बोर्ड, तहसिल कार्यालय, वर्धा.
३) नोटीस बोर्ड, जिल्हा परिषद, वर्धा.
४) नोटीस बोर्ड, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.
५) सहा. अधिभता श्रेणी-१, सिव्हील / विद्युत, सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र. १, वर्धा.
६) सहा. अधिक्षक, संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा - सदरची प्रत जिल्हा न्यायालय, वर्धा चे संकेतस्थावर प्रसिध्दीकरीता.

प्रबंधक
दिनांक : ०६/०२/२०१६. जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.